# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. २२२ ते २२७

(विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन कालावधीतील बैठका)

दिनांक : १६ जून ते २ जुलै २०१९

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| २२२ | १६ जून | सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल (अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला) | ३ |
| २२३ | १८ जून | विधानभवन, मुंबई | १ |
| २२४ | २० जून | विधानभवन, मुंबई | ६ |
| २२५ | २५ जून | विधानभवन, मुंबई | १ |
| २२६ | २७ जून | विधानभवन, मुंबई | ४ |
| २२७ | १ जुलै | विधानभवन, मुंबई | ३ |
| | | एकूण | १८ |

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. १६ जून २०१९
# (एकूण-०३)

*ग्रामविकास विभाग*

## पंचायतीमध्ये मागास प्रवर्गासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित

राज्यातील पंचायतीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या मागास प्रवर्गासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित ठेवण्याच्या घटनात्मक तरतुदीच्या धर्तीवर संबंधित पंचायतीमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठीसुद्धा लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित ठेवण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयानुसार सर्व संबंधित कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनात विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याने विधेयक मांडण्यात येणार आहे.

-----०-----

*नगर विकास विभाग*

## पुणे येथील सरहदच्या भूखंड आरक्षणात बदल

पुणे महापालिका क्षेत्रातील धनकवडी येथील सर्व्हे क्र.६ वरील सरहद संस्थेच्या भूखंडावरील क्रीडांगणाच्या आरक्षणाचे नामाभिधान हायस्कूल असे करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पुणे महापालिकेच्या मुळ हद्दीतील धनकवडी येथे असणाऱ्या सरहद संस्थेच्या मालकीच्या ५४०१ चौ.मी. क्षेत्रावरील क्रीडांगणाचे आरक्षण वगळून त्या ठिकाणी हायस्कूल असे करण्यात आले. तसेच या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण सरहद संस्था करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ (१क क) (ग) अन्वये या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

-----०-----

*नगर विकास विभाग*

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये सुधारणेस मान्यता

राज्यातील महानगरपालिकांच्या हद्दवाढीनंतर समाविष्ट झालेल्या व्यापक क्षेत्रातील लोकांना सुयोग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळण्यासह त्यासंदर्भातील प्रशासकीय अडचणी दूर करणे आवश्यक होते. त्यामुळे संबंधित क्षेत्रात निव्वळ लोकसंख्येच्या आधारे प्रतिनिधित्व निश्चित न करता पुढील सर्वसाधारण निवडणुकीपर्यंत प्रभागाचे व्यापक क्षेत्र व भौगोलिक सलगता यांच्या आधारे प्रतिनिधित्वाची निश्चिती करणे गरजेचे होते. यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

हद्दवाढ झालेले क्षेत्र व्यापक असल्यास अंतर जास्त असल्याने सर्वसाधारण जनता व लोकप्रतिनिधी यांना संवाद साधणे कठीण होते. त्यामुळे विकासकामांची अंमलबजावणी करण्यात अडचणी निर्माण होतात. प्रभागातील लोकांना महानगरपालिका कार्यालयाशी संपर्क साधणे

खर्चिक व जिकिरीचे होत असल्यामुळे प्रशासकीय अडचणी निर्माण होतात. या अडचणींवर मात करण्यासाठी आज हा निर्णय घेण्यात आला.

अधिनियमातील कलम ५(२) नुसार ३० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांमध्ये किमान सदस्य संख्या १६१ इतकी असणे आवश्यक आहे. तसेच ३० लाख लोकसंख्येपेक्षा अधिक असणाऱ्या प्रत्येक १ लाख लोकसंख्येसाठी १ सदस्य तथापि एकूण सदस्य संख्या १७५ पेक्षा अधिक असणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच कलम ५ (३) मधील तरतुदीनुसार सर्व प्रभाग आटोपशीर क्षेत्र होतील आणि प्रत्येक प्रभागातील व्यक्तींची संख्या जवळपास तेवढीच राहणार आहे. त्याचप्रमाणे कलम ५ (४) मधील तरतुदींनुसार शहराच्या क्षेत्रांचा विस्तार करण्यात आल्यास वाढीव क्षेत्रातील लोकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जमेल तितक्या लवकर निवडणुका घेण्यात येतील आणि पोटकलम ३ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारासह अशा निवडणुकांना लागू होतील, अशी तरतूद आहे.

आजच्या निर्णयानुसार कलम ५ (४) मधील पहिल्या परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येणार आहे. त्यानुसार सर्वसाधारण निवडणुकांनंतर महापालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आलेले क्षेत्र आटोपशीर नसेल आणि त्याचे क्षेत्र सध्या अस्तित्वात असलेल्या प्रभागांपेक्षा बरेच मोठे असेल तर प्रत्येक ५० हजार अतिरिक्त लोकसंख्येसाठी एक प्रभाग कण्यात येईल. मात्र, पूर्वीच्या परंतुकानंतर निर्माण करण्यात आलेले प्रभाग महानगरपालिकेच्या पुढील सर्वसाधारण निवडणुकांपर्यंत अस्तित्वात राहणार आहेत.

-----०-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. १८ जून २०१९
# (एकूण-०१)

*वित्त विभाग*

**वित्तमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणास मान्यता**

राज्याच्या वित्तमंत्र्यांकडून विधानमंडळात सादर करण्यात येणाऱ्या २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय भाषणास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. २० जून २०१९
# (एकूण-०६)

*महसूल विभाग*

**मुंबई उपनगरामध्ये अकृषिक वापरासाठी दिलेल्या शासकीय जमिनींसंदर्भात धोरणात्मक दिशानिर्देश**

मुंबई उपनगर जिल्ह्यात शासनाच्या मंजुरीने अकृषिक वापरासाठी वितरित करण्यात आलेल्या शासकीय जमिनींच्या विक्री अथवा हस्तांतरणाबाबत एचएच फॉर्ममध्ये कोणतीही अट नमूद नसताना अशा जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध आलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात धोरण निश्चित करण्यास आणि त्यानुसार क्षेत्रीय महसुली अधिकारी-प्राधिकाऱ्यांना धोरणात्मक दिशानिर्देश देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मुंबई जमीन महसूल संहिता-१८७९ आणि मुंबई जमीन महसूल नियम-१९२१ च्या नियम ४३ मधील तरतुदीनुसार मुंबई उपनगर जिल्ह्यात शासनाच्या मंजुरीने अकृषिक वापरासाठी वितरित करण्यात आलेल्या शासकीय जमिनींच्या प्रतिग्रहित्यासोबतच या नियमांमधील एचएच फॉर्ममध्ये जमीन प्रदानाच्या अटी व शर्तीसह करारनामा करण्यात आला आहे. एचएच फॉर्ममध्ये केलेल्या करारनाम्यामध्ये या जमिनींच्या विक्री अथवा हस्तांतरणावरील निर्बंधाबाबत कोणतीही अट नमूद नसताना अशा जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध आलेले आहेत. त्याबाबतीत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार शासनास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत यासंदर्भात धोरण निश्चित करण्यास आणि त्यानुसार क्षेत्रीय महसुली अधिकारी-प्राधिकाऱ्यांना धोरणात्मक दिशानिर्देश देण्यात येणार आहेत. रितसर चौकशी करताना अर्जदार व संबंधित व्यक्ती अथवा संस्थांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आणि कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखांच्या आधारेच गुणवत्तेवर निर्णय घेऊन अर्ज-निवेदन दाखल झाल्यापासून जास्तीत जास्त ६० दिवसांच्या आत सुस्पष्ट सकारण आदेश (Reasoned Order) पारित करावे लागणार आहेत.

आजच्या निर्णयानुसार संबंधित जमिनींसंदर्भात रितसर चौकशी करून अशा जमिनींच्या अधिकार अभिलेखात नोंदण्यात आलेला ब-१ सत्ता प्रकार वगळण्याबाबत अथवा यथास्थिती कायम करण्याबाबत गुणवत्तेवर निर्णय घेऊन सुस्पष्ट आदेश पारित करण्यात येतील. अशा वेळी

जमिनींचे प्रदान आदेश, सनद किंवा एचएच फॉर्म करारनाम्यामध्ये विक्री किंवा हस्तांतरणविषयक निर्बंधात्मक तरतूद स्पष्टपणे नमूद केलेली नसल्यास अशा जमिनींच्या अभिलेखामध्ये बी-१ सत्ता प्रकाराऐवजी सी-सत्ता प्रकार अथवा भोगवटादार वर्ग-१ अशी नोंद घेण्यात येईल. त्यापोटी प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार येणाऱ्या किंमतीच्या २.५ टक्के इतकी रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे जमिनींचे प्रदान आदेश, सनद किंवा एचएच फॉर्म करारनाम्यामध्ये विक्री किंवा हस्तांतरणविषयक निर्बंधात्मक तरतूद स्पष्टपणे नमूद केलेली असल्यास अशा जमिनींच्या अभिलेखामध्ये बी-१ सत्ता प्रकाराऐवजी सी-सत्ता प्रकार अथवा भोगवटादार वर्ग-१ अशी नोंद घेण्यात येईल. फक्त २५ टक्के किंवा यथास्थिती एक तृतियांश जमिनीवर बांधकाम करून उर्वरित जागा मोकळी ठेवण्याची किंवा तत्सम अटी असतील तर अशा प्रसंगी काही अटी शिथिल करून अशी जमीन विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार विकसित करता येईल. त्यापोटी प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार येणाऱ्या किंमतीच्या १० टक्के इतकी रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----o-----

*वने विभाग*

## शहरी आणि ग्रामीण भागात
## अटल आनंदवन घन वन प्रकल्प

राज्यातील हवामान, स्थानिक परिस्थिती, पावसाचे प्रमाण आणि पाण्याची उपलब्धता इत्यादी बाबी लक्षात घेऊन शहरी आणि ग्रामीण भागामध्ये अटल आनंदवन घन वन प्रकल्प राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

शहरी आणि ग्रामीण भागात प्रदूषणावर मात करुन आरोग्यदायी वातावरण व पर्यावरण निर्मिती करण्यासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. राज्यातील वन आणि वनेतर क्षेत्रावरील वृक्षाच्छादन २० टक्क्यांवरून ३३ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी हरित महाराष्ट्र प्रकल्प राबविण्यात येत आहे. राज्यात ५० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत १ जुलै २०१९ ते ३० सप्टेंबर २०१९ या तीन महिन्यांच्या कालावधीत ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

उपलब्ध कमी क्षेत्रामध्ये जास्त वृक्षांचे आवरण आणि घन वन (Dense Forest) निर्माण करण्याचा प्रयोग जपानमध्ये श्री. मियावाकी या वनस्पती शास्त्रज्ञाने सुरू केला. भारतामध्ये बंगलोर, हैद्राबाद इत्यादी ठिकाणी हा प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात आला आहे. तसेच राज्यात जालना, औरंगाबाद, हिंगोली, बीड, लातूर, पुणे, जळगाव अशा जिल्ह्यांमध्ये विशेषत: वन विभाग तसेच सामाजिक वनीकरणांच्या जागांवर प्रायोगिक तत्त्वावर गेल्या दोन वर्षांपासून घन-वन वृक्ष लागवड अल्प प्रमाणावर घेण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील आनंदवन (वरोरा) येथील महारोगी सेवा समितीच्या जमिनीवर हा प्रकल्प उत्तमरितीने विकसित केला आहे. या बाबी विचारात घेऊन राज्यामध्ये घन-वन प्रकल्प हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी विविध स्त्रोतांतून निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांकडे आणि शहर विकास प्राधिकरणाकडे स्वत:च्या उत्पन्नातून तसेच वृक्ष लागवडीसंबंधातील विविध योजनेतून उपलब्ध होणारा निधी या प्रकल्पासाठी वापरण्यात येईल. प्रत्येक प्रशासकीय विभागांना वृक्षारोपण आणि संगोपनासाठी उपलब्ध होणारा ०.५ टक्क्यांच्या

मर्यादेतील निधीचाही यासाठी वापर करता येईल. त्याचप्रमाणे सामाजिक दायित्व निधी (CSR Funds), डीपीसी, खाण विकास निधी, आमदार किंवा खासदार निधी आणि अन्य इतर कोणत्याही स्त्रोतातून उपलब्ध होणारा निधी यांच्या वापरातूनही प्रकल्पाला चालना देता येणार आहे.

-----o-----

*नगर विकास विभाग*

**शिरुरमधील बाल क्रीडांगणाच्या आरक्षण बदलास मान्यता**

पुणे जिल्ह्यातील शिरुर नगरपालिकेच्या दुसऱ्या सुधारित मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्र.२४ च्या भूखंडावरील बाल क्रीडांगणाचे आरक्षण वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

शिरुर नगरपालिकेच्या हद्दीत बाल क्रीडांगण म्हणून १६६० चौ.मी. इतकी जागा आरक्षित आहे. एवढ्या कमी जागेवर बाल क्रीडांगण विकसित करणे योग्य होणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये क्रीडांगणाचे आरक्षण वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शिरूर मंजूर विकास योजनेतील स.नं. ११३० ब मधील क्रीडांगणासाठी राखीव ठेवलेले ६ एकर क्षेत्र नगरपालिकेने खेळ सुविधा विकसित करण्यासाठी तालुका क्रीडा संकूल समितीच्या नावावर तात्काळ हस्तांतरित करण्याच्या अटीवर ही मान्यता देण्यात आली आहे.

-----o-----

*उच्च व तंत्रशिक्षण विभाग*

**औरंगाबाद येथे एमजीएम युनिव्हर्सिटी स्थापनेस मान्यता**

औरंगाबाद येथे एमजीएम युनिव्हर्सिटी या स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठाच्या स्थापनेस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यापीठ सुरु करण्यात येणार आहे.

महात्मा गांधी मिशन नांदेड यांच्या माध्यमातून या विद्यापीठाची स्थापना होत आहे. या संस्थेकडून यापूर्वीच व्यवस्थापन, अभियांत्रिकी, वैद्यकीय, हॉटेल मॅनेजमेंट, फाईन आर्टस् ॲण्ड जर्नालिझम असे अभ्यासक्रम चालविण्यात येत आहेत. सिडकोमध्ये शैक्षणिक वापरासाठी असलेल्या दराच्या १० टक्के इतकी रक्कम या संस्थेला अनर्जित म्हणून सिडकोकडे जमा करावी लागणार आहे. स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठाच्या स्थापनेनंतर मॉडर्न मॅनेजमेंट, नृत्य, संगीत, फॅशन डिझाईन असे विविध अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. यामुळे औरंगाबाद परिसरातील विद्यार्थ्यांना विविध ज्ञानशाखांची अध्ययन सुविधा उपलब्ध होणार आहे. या विद्यापीठामध्ये सामाजिक आरक्षणासह महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी ४० टक्के जागा आरक्षित असणार आहेत. विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव विधानमंडळासमोर सादर करण्याच्या विधेयकाच्या मसुद्यासही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

**मालमत्ता हक्क प्रमाणीकरण प्रणालीसाठी**
**स्वतंत्र अधिनियम करण्यास मान्यता**

अधिकार अभिलेख हा मालकी हक्काचा निर्णायक पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येत नसल्यामुळे व्यवसायामध्ये गुंतवणूक, जमिनीचा विकास किंवा जमीन हस्तांतरण करताना प्रत्येकवेळी संबंधित जमिनीच्या मालकी हक्कांसंदर्भात तपासणी किंवा शहानिशा करण्यात कालापव्यय होतो. या बाबींवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी बदलत्या काळानुसार राज्यात मालमत्ता हक्क प्रमाणीकरण प्रणाली लागू करणे शक्य व्हावे म्हणून स्वतंत्र कायदा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मालमत्ता हक्क प्रमाणीकरण प्रणालीमुळे जमीन अथवा त्यावरील स्थावर मिळकतीच्या मालकी हक्काचे संरक्षण करणारी व निर्णायक अंतिम पुरावा उपलब्ध करुन देणारी पारदर्शक आणि सर्वांना खुली असणारी प्रशासकीय व्यवस्था निर्माण होणार आहे. तसेच जमीन व्यवस्थापन प्रणालीमध्ये सुधारणा होण्यासह जमिनीवर उभारलेल्या इमारतीमधील गाळे, सदनिका इत्यादींबाबतच्या मालकी हक्काच्या नोंदी करण्याची तरतूद उपलब्ध होईल. तसेच शासनाने आणि शासनाच्या प्राधिकरणाने वाटप केलेल्या मालमत्तांच्या व्यवस्थापनात सुधारणा होण्यासह मालकी हक्कांचे संरक्षण करणे शक्य होणार आहे. जमीन व त्यावरील स्थावर मिळकतीच्या हस्तांतराच्या व्यवहारामध्ये होणारी फसवणूक आणि अनियमितता यांपासून खरेदीदार व्यक्तींना संरक्षण मिळणार आहे.

या प्रणालीअंतर्गत कोणत्याही व्यक्तीने कपटपूर्वक किंवा लबाडीने कोणत्याही स्वरुपाच्या हक्कांचे प्रमाणीकरण करुन घेतल्याचे निष्पन्न झाल्यास असे प्रमाणीकरण प्रारंभापासून निष्प्रभ (ab-initio void) राहील, अशा आशयाची तरतूदही या विधेयकात करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येणार आहेत.

-----o-----

*उद्योग विभाग*

<u>उचित भरपाई मिळण्यासह पारदर्शकतेचा हक्क अधिनियम</u>
**अधिसूचना काढण्यास २ वर्षांच्या मुदतवाढीस मान्यता**

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम-२०१८ मधील कलम १०५-क मध्ये नमूद अधिसूचना काढण्यास १ वर्षाऐवजी २ वर्षांची मुदतवाढ देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यामध्ये विदेशी कंपन्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असून या उद्योगांसाठी तातडीने जमिनीची आवश्यकता आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१ नुसार बऱ्याच ठिकाणी भूसंपादन सुरु आहे. या अधिनियमानुसार होणारे भूसंपादन जलदगतीने पूर्ण करण्यासाठी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ अधिनियमामधील कलम १०-क(घ) तसेच कलम १०५-क (१) पोटकलम (२) मध्ये निर्देशित

केल्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१ नुसार संपादित जमिनींना सूट देणे आवश्यक आहे. त्यानुसार भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम-२०१८ मधील कलम १०५ (क) मध्ये नमूद अधिसूचना काढण्यास मुदतवाढ देण्यात आली.

याअंतर्गत केल्या जाणाऱ्या सुधारणा अधिनियम प्रारंभाच्या दिनांकापासून लागू होणार आहेत. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यातील कलम २, ३३, ३४, ३५, ३६ व ३७ यात योग्य त्या सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. २५ जून २०१९
# (एकूण-०१)

*वित्त विभाग*

## खर्चाच्या पूरक विवरणपत्रासह पुरवणी विनियोजन विधेयकास मान्यता

राज्याच्या २०१९-२० च्या खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करण्यासह महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक-२०१९ विधानमंडळास सादर करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. २७ जून २०१९
# (एकूण-०४)

*वने विभाग*

**अटल बांबू समृद्धी योजना राज्यात राबविणार**

शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी राज्यात अटल बांबू समृद्धी योजना राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात टिश्यु कल्चर बांबू रोपांचा पुरवठा होणार आहे.

शेतजमिनीवर तसेच शेताच्या बांधावर बांबू लागवडीसाठी या योजनेंतर्गत चार हेक्टरपेक्षा कमी शेत जमीनधारकांना ८० टक्के तर त्यावरील जमीनधारकांना ५० टक्के सवलतीनुसार ६०० टिश्यु कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करण्यात येणार आहे. महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या मान्यता प्राप्त रोपवाटिकेतून टिश्यू कल्चर बांबू रोपांची खरेदी करुन शेतात लागवड केल्यानंतर शासनाचा हिस्सा बँक खात्यात जमा होणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २०१९-२० साठी २५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

-----०-----

*जलसंपदा विभाग*

पेंचमधील पाणीप्रश्न सुटणार

**तोतलाडोह जलाशयात दहा टीएमसी पाणी वळविणार**

पेंच प्रकल्पातील गंभीर पाणीटंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी मध्य प्रदेशमधील लोहघोगरी गावाजवळून (जि. छिंदवाडा) बोगद्याव्दारे कन्हान नदीतून १० टीएमसी पाणी तोतलाडोह जलाशयात वळविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

मध्यप्रदेशातील चौराई धरणामुळे महाराष्ट्रातील पेंच प्रकल्पात गंभीर पाणीटंचाई निर्माण होते. यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी मध्यप्रदेशातील लोहघोगरी गावाजवळून कन्हान नदीतून बोगद्याद्वारे १० टीएमसी पाणी तोतलाडोह जलाशयात वळविण्यात येणार आहे. या योजनेसाठी सविस्तर सर्वेक्षण व संकल्पन आणि प्रकल्प व्यवस्थापनाकरिता केंद्र शासनाच्या वॅपकोस (WAPCOS) या अभिकरणास नियुक्त करण्यात येणार आहे. या प्रकल्पास जामघाट प्रकल्पाप्रमाणेच महाराष्ट्र व मध्यप्रदेश शासनाच्या आंतरराज्यीय नियंत्रण मंडळाकडून मान्यता मिळविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे. या योजनेसाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र घेण्याबरोबरच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, पर्यावरण, वनजमीन, केंद्रीय जलआयोग इत्यादी आवश्यक मान्यता घेण्यात येणार आहेत.

-----०-----

*ग्रामविकास विभाग*

**नगरपंचायत सदस्यांनाही १९८६ चा सदस्य अनर्हता कायदा लागू**

राज्यातील नगरपंचायती आणि नगरपंचायत सदस्यांना महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम लागू करण्याचा आणि त्यासाठी अधिनियमात आवश्यक त्या सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम-१९८६ च्या निर्मितीनंतर राज्यात मोठ्या प्रमाणात नगरपंचायती निर्माण झाल्या आहेत. आजमितिस राज्यात १२८ नगरपंचायती कार्यरत आहेत. नगरपरिषदा व नगरपंचायतीचे कामकाज महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम-१९६५ नुसार होते. या अधिनियमात अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या निवडणुका, सदस्य अपात्रता याबाबतच्या तरतुदी दोन्हींसाठी सारख्याच आहेत. मात्र, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम-१९८६ मध्ये नगरपंचायत आणि नगरपंचायत सदस्यांचा समावेश नाही. त्यामुळे या अधिनियमात नगरपंचायत व नगरपंचायत सदस्य या शब्दांचा अंतर्भाव करण्याबाबत सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार संबंधित कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याने राज्य विधानमंडळाच्या चालू अधिवेशनात विधेयक मांडण्यात येणार आहे. चालू अधिवेशनात विधेयक मांडणे शक्य न झाल्यास किंवा पारित न झाल्यास अध्यादेश काढण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

*संसदीय कार्य विभाग*

**विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन २ जुलैला संस्थगित**

महाराष्ट्र विधानमंडळाचे सध्या सुरु असलेले अधिवेशन मंगळवार दि. २ जुलै २०१९ रोजी दोन्ही सभागृहातील त्या दिवसाचे कामकाज समाप्त झाल्यानंतर संस्थगित करण्यात यावे, अशी शिफारस राज्यपालांना करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच आगामी अधिवेशनाच्या तारखेबाबत मंत्रिमंडळासमोर योग्य वेळेस प्रस्ताव सादर करुन स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येणार आहे.

-----०-----

## मंत्रिमंडळ निर्णय
## दि. ०१ जुलै २०१९
## (एकूण-०३)

*उच्च व तंत्र शिक्षण विभाग*

**कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठांतर्गत**
**महाविद्यालयांतील संगणकशास्त्र विषयास अनुदान**

जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत ५ महाविद्यालयांतील संगणकशास्त्र या विषयास अनुदान देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विद्यापीठांतर्गत मुळजी जेठा महाविद्यालय जळगाव- १ पद, एसएमपी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जळगाव- १ पद, भुसावळ कला व विज्ञान व पु.आ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय भुसावळ- ३ पदे, डॉ. पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालय धुळे- ४ पदे, झेड.बी. पाटील महाविद्यालय धुळे- ३ पदे याप्रमाणे एकूण १२ पदांना अनुदान देण्यात येणार आहे. ही पदे महाविद्यालयातील ऑक्टोबर २०१० च्या विद्यार्थी संख्येवर आधारित असतील. तसेच शासन निर्णय प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अनुदान दिले जाणार असून मागील थकबाकी मिळणार नाही.

-----०-----

*विधि व न्याय विभाग*

## विटा येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापनेस मान्यता

सांगली जिल्ह्यातील विटा येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) हे न्यायालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. हे न्यायालय विटा, पलूस, कडेगाव व आटपाडी या तालुक्यांसाठी कार्य करेल.

न्यायालय स्थापनेसाठी आवश्यक असलेली २५ पदे (२३ नियमित पदे व २ काल्पनिक-बाह्य यंत्रणेद्वारे) उप समिती व उच्चस्तरीय सचिव समितीच्या शिफारशींच्या अधीन राहून निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच यासाठीच्या १ कोटी ४४ लाख ७१ हजारांच्या वार्षिक खर्चास मंजुरी देण्यात आली.

-----०-----

*सामान्य प्रशासन (साविस)*

## एसईबीसी वर्गासाठीच्या आरक्षण अधिनियम-२०१८ मध्ये सुधारणा

राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण अधिनियम-२०१८ कलम ४(१)(क) व (ख) मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्याचा आली.

याअंतर्गत भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेल्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांखेरीज इतर अनुदानप्राप्त किंवा अनुदान मिळत नसलेल्या शैक्षणिक संस्था तसेच खाजगी शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाच्या एकूण जागांच्या १६ टक्क्यांऐवजी १२ टक्के अशी सुधारणा करण्यात आली. तसेच राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील आणि पदांवरील सरळसेवा प्रवेशाच्या एकूण नियुक्त्यांच्या १६ टक्क्यांऐवजी १३ टक्के अशी सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली.

-----०-----